दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ३४५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.११ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची प्रलंबित कामे पूर्ण करणार : ना.अशोक चव्हाण


**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोकणातून जाणा-या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग रस्त्यांची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील आहे अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी विधानसभेत दिली.

रत्नागिरी जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटामध्ये रस्ता चौपदीकरणामुळे अपघात होवून सतत दुर्घटना होत आहेत यावर तातडीने कार्यवाही करावी अशी लक्षवेधी विधानसभा सदस्य भास्कर जाधव यांनी विधानसभेत मांडली.

यावेळी या लक्षवेधी चर्चेत विधानसभा सदस्य आशिष शेलार, नितेश राणे, सुधीर मुनगंटीवार, शेखर निकम यांनी या विषयाच्या अनुषंगाने कोकणातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गासंदर्भात प्रश्न उपस्थित केले.

# भाजपचं घवघवीत यश, पाच पैकी चार राज्यात भाजपला एकहाती सत्ता



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाच्या ५ राज्यांतील विधानसभा निवडणूक निकालांमध्ये भाजपला मोठं यश मिळालं आहे. भाजपने पंजाब वगळता इतर सर्वच राज्यांमध्ये कमळ फुलविण्यात यश मिळवलं असून भाजपच्या विजयाचा देशभरात जल्लोष होत आहे. उत्तर प्रदेश, गोवा, पंजाब, उत्तराखंड आणि मणिपूरमध्ये सत्तेची सेमिफायनल भाजपनं जिंकली आहे. पाच पैकी चार राज्यात भाजपनं आपला करिष्मा कायम ठेवलाय. उत्तर प्रदेशमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळालंय. त्यामुळे आता उत्तर प्रदेशमध्ये पुन्हा योगीराज पाहायला मिळेल. गोवा, उत्तराखंड, मणिपूरमध्येही भाजपचा दबदबा कायम आहे. तिकडे पंजाबच्या निकालानं पूर्ण राजकारण बदललंय. पंजाबमध्ये आम आदमी पक्षानं इतर पक्षांचा सुपडासाफ केला आहे.

सर्वात मोठी लढाई उत्तर प्रदेशची होती. जी भाजपनं जिंकलेली आहे. उत्तर प्रदेशच्या जनतेनं भाजपला स्पष्ट बहुमत दिले आहे. भाजप २७२ जागा तर समाजवादी पक्षाला १२६ जागांवर समाधान मानावं लागलंय. बसपाला १ तर काँग्रेसला दोन जागांवर समाधान मानावे लागले.



गोव्यात भाजप सलग दुसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार हे आता स्पष्ट झालंय. गोव्यात बहुमताचा आकडा २१ इतका आहे, भाजपला २० जागांवर यश मिळाले. त्यामुळे गोव्यात भाजपचा सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झालाय. कारण तीन अपक्ष विजयी उमेदवारांनी भाजपला समर्थन दिलयं. अतिरिक्त संख्याबळासाठी महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाशी भाजपची बोलणीही सुरु केलीय. त्यामुळं आता भाजप राज्यपालांना भेटून सत्तास्थापनेचा दावा करणार आहे. गोव्यात १४ मार्च रोजी शपथविधी सोहळा पार पडणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

पंजाब विधानसभा निवडणुकीच्या निकालामध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आप पक्षाची त्सुनामी आली आहे. आप पक्षाने पंजाबमध्ये सत्ताधारी काँग्रेससह भाजपचाही सुपडा साप केला आहे. पंजाबमधील जनतेने आप पक्षाच्या बाजूने कौल दिला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पंजाबमध्ये अनेक दिग्गजांना पराभवाचा धक्का बसला आहे. पंजाबमध्ये ९२ जागांवर विजय संपादन केला आहे.

उत्तराखंडमध्ये भाजपचा सर्व पक्षांना मागे सोडत ४८ जागांवर विजय झाला. तर काँग्रेस १८ जागा मिळाल्या. उत्तराखंडमध्ये आम आदमी पक्षाला खातेही उघडता आले नसून इतर पक्षांना ४ जागांवर विजय मिळाला आहे. सुरुवातीच्या ट्रेंडमध्ये, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या निवडणुकीच्या निकालाबाबत बरेच चढ-उतार पाहायला मिळाले. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांना त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराकडून कडवी स्पर्धा मिळत आहे. दुसरीकडे, काँग्रेसचे दिग्गज नेते आणि माजी मुख्यमंत्री हरीश रावत यांचा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला आहे.

मणिपूरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या ६० जागांसाठी निवडणूक झाली असून यामध्ये भाजपने एकहाती सत्ता स्थापन करण्याच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकून ३२ जागांवर विजय मिळविला आहे. तर काँग्रेस ०४, एनपीपी ०५ आणि इतर पक्षांनी १९ जागांवर विजय संपादन केला आहे.

## सर्वधर्म समभाव एकत्रित असल्याचे प्रतिक नवी मुंबईत दिसून आले : सुरेश मेंगडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१९९३ सालच्या जातीय दंगली असो किंवा २ वर्षापासून सुरू असलेला कोरोना काळ असो, या काळात माणसांनी माणसांशी कसे जगावे याची शिकवण सगळ्यांना मिळाली. सर्वांनी आपली जात, धर्म, पंथ विसरुन एकमेकांना मदतीचा हात दिला व संपूर्ण देशामध्ये एक वेगळे चित्र दिसून आले. याचा हेवा परदेशी देशांना होत आहे की भारत देश हा एकसंघ आहे. हेच वातावरण नवी मुंबई परिसरात असल्याने एक सलोख्याचे चित्र प्रत्येक वेळी दिसून येत असल्याने यासाठी समाजाचे देणे लागतो या भावनेतून काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान आज पोलीस आयुक्तालय नवी मुंबई स्वतंत्र भारताचा ७५ वा अमृत महोत्सवांतर्गत आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे संपन्न होत असून या कार्यक्रमामधून एक सामाजिक बांधिलकीचा संदेश सर्वत्र जात असल्याचे प्रतिपादन नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त सुरेश मेंगडे यांनी व्यक्त केले.




या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपायुक्त सुरेश मेंगडे, परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहा.पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते बाबा आलम, मौलाना मुफ्ती मामुन रशीद, मा.नगराध्यक्ष सईद मुल्ला, सामाजिक कार्यकर्त्या माधुरी गोसावी, मानसी पाटील, फादर पॉल आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राथमिक स्वरुपात कोविड काळात समाजासाठी अहोरात्र झटणाऱ्या व्यक्तींचा प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना सुरेश मेंगडे यांनी सांगितले की, मानवता हाच मुख्य धर्म असून माणसाने माणसाच्या मदतीला धावले पाहिजे. कोरोनाच्या काळामध्ये अनेक जण घरी बसून होते. यावेळी फक्त पोलीस हाच रस्त्यावर होता. अनेक ज्येष्ठ नागरिकांना गेल्या दोन वर्षापासून मदत करण्याचे काम पोलिसांनी केले आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या मदतीसाठी वेगळी हेल्पलाईन सुरू करण्यात आली असून तेथे संपर्क साधल्यास तात्काळ जवळील पोलीस ठाण्याचे पथक त्यांच्या मदतीला धाव घेते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नवी मुंबई हे एक नंबरला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आगामी पिढीकडे पाहताना आपण त्यांच्या व्यसनांकडे सुद्धा लक्ष घालणे जरुरीचे आहे.


.../२

## मच्छीमार संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा द्या

### आ.प्रशांत ठाकूर यांची शासनाकडे मागणी; तारांकित प्रश्नाद्वारे वेधले शासनाचे लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यातील १६० मच्छिमार सहकारी संस्थामधील ९६४६ यांत्रिकी नौकांना शासनाकडून मंजूर करण्यात येत असलेल्या डिझेल कोट्यामधील खर्चाच्या परताव्याची १८६ कोटी थकीत रक्कम मच्छिमारांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे निदर्शनास असून त्यांना तसेच रायगड जिल्ह्यातील मच्छीमार संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा मिळावा, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे.



राज्यातील १६० मच्छिमार सहकारी संस्थामधील ९६४६ यांत्रिकी नौकांना शासनाकडून मंजूर करण्यात येत असलेल्या डिझेल कोट्यामधील खर्चाच्या परताव्याची १८६ कोटी थकीत रक्कम मच्छिमारांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे. सन २०१७ या कालावधीपासून डिझेल परताव्याची रक्कम जवळपास ४८ कोटी रुपयांपेक्षा जास्त असताना रायगड जिल्हयातील मच्छीमार संस्थांना फक्त २ कोटी रुपये वितरीत करण्यात आले तसेच शासनाने सन २०२०-२१ या कालावधीत मंजूर केलेल्या ६० कोटी रुपयांपैकी १८ कोटी रुपये निधी माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान मच्छिमार संस्थांना अदा केले. रायगड जिल्हयातील मच्छीमार संस्थांनी डिझेल परताव्याची प्रकरणे सहाय्यक मत्स्य व्यवसाय अधिकारी यांच्याकडे सादर करून बराच कालावधी होवूनसुद्धा डिझेल परतावा न मिळल्यामुळे तसेच निसर्ग वादळ, कोरोना संकट, तौक्तये वादळ या सर्व संकटांमुळे मच्छिमारांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून मच्छिमारांना नुकसान भरपाई तसेच १०० टक्के डिझेल परतावा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्न दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे मत्स्यविकास मंत्री अस्लम शेख यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपुर्ती योजनेंतर्गत सन २०२१-२०२२ (दिनांक ३१ जानेवारी, २०२२ अखेर) पर्यंत सात सागरी जिल्ह्यातील १९७० मच्छिमार सहकारी संस्थांचे २५३.९७ कोटी रुपये इतक्या रक्कमेचे प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडे निधी अभावी प्रलंबित आहेत. योजने अंतर्गत सन २०१७-१८ पासून माहे जानेवारी २०२२ अखेर रायगड जिल्हयास ४२.०१ कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०२०-२१ मध्ये रु. ५९.९९ कोटी इतका निधी सर्व सागरी जिल्हयांना वितरीत करण्यास आला असून, त्यापैकी

.../२

## संक्षिप्त...

### 'महाराष्ट्र अभी बाकी है' असं म्हणणाऱ्यांना शरद पवारांचं कडक उत्तर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

उत्तर प्रदेशसह पाच राज्यांच्या निवडणूक निकालांमध्ये सरशी झाल्यामुळं भारतीय जनता पक्षामध्ये आनंदाचं वातावरण आहे. महाराष्ट्रातील नेत्यांनी महाविकास आघाडीवर नव्या जोमाने हल्लाबोल सुरू केला आहे. 'यूपी तो झाँकी है... महाराष्ट्र अभी बाकी है' अशा घोषणा भाजपचे नेते, कार्यकर्ते देऊ लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अत्यंत सूचक प्रतिक्रिया दिली आहे. पाच राज्यांतील निकालाच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी मुंबईत पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी पवारांनी उत्तर प्रदेश, पंजाब, गोव्यातील निकालाबाबतच्या प्रश्नांना उत्तरं दिली. त्याचबरोबर या निकालानंतर भाजपच्या गोटातून महाराष्ट्राबद्दल येणाऱ्या प्रतिक्रियांचाही त्यांनी समाचार घेतला. निकाल भाजपच्या बाजूनं लागताच विधानभवनात भाजपच्या काही आमदारांनी आज यूपी तो झाँकी है, महाराष्ट्र बाकी है... अशा घोषणा दिल्या. त्यावर शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली. 'महाराष्ट्र बाकी आहे असं म्हणत असाल तर महाराष्ट्र तयार आहे,' असं सूचक वक्तव्य त्यांनी केलं. 'यूपी किंवा इतर राज्यांतील निकालामुळं महाराष्ट्रात कुठलाही मोठा बदल होणार नाही.

## कर्जत नगरपरिषदेमार्फत नागरिकांच्या मालमत्ता इमारतींचे सर्वेक्षण ; मात्र अनधिकृत बांधकामांना अभय

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषदेमार्फत नागरिकांच्या मालमत्ता इमारतींचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे, मात्र अनधिकृत बांधकामांचे काय?असा प्रश्न माहिती अधिकार कार्यकर्ता प्रभाकर गंगावणे यांनी सोशल मीडिया टाकून उपस्थित केला आहे.

कर्जत नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १२४ अन्वये फेर मुल्यांकन कामांकरिता इमारतींचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे तश्या नोटीसा नगरपरिषद तर्फे सोसायटी, घर मालक यांना पाठविण्यात आल्या आहेत.

कर्जत नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा ठेका नागपुर येथील मे. आर. एस. कन्स्ट्रक्शन या कंपनीला दिला गेला आहे. आज कित्येक वर्षांनी नगरपरिषद हद्दीतील सर्व मालमत्तेचे नव्याने सर्वेक्षण करण्यात येणार आहे. परंतु, नगरपरिषद हद्दीतील अनेक इमारतींमधील रहिवाशांनी व विकासकांनी नगरपरिषद, सोसायटीची परवानगी न घेता तळमजल्याच्या शेजारी, घरासमोर, पार्किंग मध्ये व टेरेसवर पक्के बांधकाम करुन बेकायदेशीर अतिक्रमणे केली आहेत. त्यांच्यावर हातोडा फिरवणार की, आर्थिक लाभासाठी त्या अतिक्रमणांवर अनधिकृत असा शिक्का मारुन नगरपरिषद प्रशासन महसुल जमा करणार का?असा प्रश्न प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या करदात्यांना पडला आहे.

शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे करुन दुकानांच्या टप-या उभ्या केल्या गेल्या आहेत त्यांच्यावरही नगरपरिषद कारवाई करणार की, अशाप्रकारे अनधिकृत बांधकामे करणा-यांना अभय देऊन त्यांच्याशी आर्थिक सलोखा वाढवणार असाही यक्ष प्रश्न करदात्यांना पडला आहे. जे नागरिक प्रामाणिकपणे आणि वेळेवर कर भरतात त्यांना मात्र नगरपरिषदेकडुन योग्य सोयी सुविधा मिळत नाहीत. परंतु, असुविधांमुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. कर्जत बाजारपेठेत तर हातगाड्या व हातगाड्यांसमोर वेड्यावाकड्या उभ्या राहिलेल्या रिक्षा तसेच इतर वाहनांमुळे

.../२

## श्रीवर्धनचे गटविकास अधिकारी रजेवर असल्याने निवृत्त शिक्षकांचे निवृत्ती वेतन रखडले

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात अनेक निवृत्त प्राथमिक शिक्षक असून त्यांना दर महिन्यांचे निवृत्तीवेतन श्रीवर्धन पंचायत समितीकडून अदा करण्यात येते. परंतु मागील कित्येक महिन्यांपासून या निवृत्त शिक्षकांना निवृत्तिवेतन महिन्याच्या पंधरा ते वीस तारखे नंतरच मिळत असते.

वास्तविक पाहता शासकीय नियमानुसार निवृत्ती वेतन धारक शिक्षकांना त्यांचे निवृत्तीवेतन महिन्याच्या एक तारखेला अदा करायचे असते. परंतु श्रीवर्धन पंचायत समितीकडून नेहमीच निवृत्ती वेतनधारकांना निवृत्ती वेतन अदा करण्यामध्ये उशीर केला जातो. याबाबत अनेक वेळा श्रीवर्धनचे गटविकास अधिकारी उद्धव होळकर यांच्या जवळ संपर्क साधला असता शासनाकडून निधी वेळेवर प्राप्त होत नसल्याने निवृत्ती वेतन वेळेवर करता येत नाही असे कारण सांगण्यात येते. त्यामुळे निवृत्तीवेतनधारकां मध्ये नाराजीचा सूर पसरलेला पाहायला मिळतो. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी शिक्षकी पेशा साठी वेचले अशा निवृत्तीवेतन धारक शिक्षकांना निवृत्तिवेतन देखील वेळेवर मिळत नाही. याबाबत शासनाची उदासीनता असल्याचे निवृत्तीवेतनधारकांचे म्हणणे आहे.

मार्च महिन्याची दहा तारीख उलटून गेली तरी निवृत्ती वेतनधारक शिक्षकांना अद्याप निवृत्ती वेतन मिळालेले नाही. याबाबत श्रीवर्धन पंचायत समिती मध्ये जाऊन चौकशी केली असता, असे सांगण्यात आले की, गटविकास अधिकारी रजेवर असल्याने निवृत्ती वेतनधारकांचे निवृत्ती वेतन अदा करण्यात आलेले नाही. गटविकास अधिकारी पंचायत समितीत हजर झाल्यानंतर निवृत्ती वेतनधारक शिक्षकांचे निवृत्ती वेतन त्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल. मात्र गटविकास अधिकारी

.../२

## माणगाव तहसिल कार्यालय येथे गरुडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन अभ्यासिकेचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या गरुडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत दि.०९ मार्च २०२२ रोजी माणगाव तहसिल कार्यालय येथे अभ्यासिकेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या हस्ते पार पडले.

या अभ्यासिकेच्या माध्यमातून सर्व महाविद्यालयीन तसेच स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना विविध पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच ही अभ्यासिका पूर्ण आठवडाभर २४ तास सुरु राहणार असल्याबाबत जाहीर करण्यात आले.



या कार्यक्रमास माणगाव उपविभागीय अधिकारी श्रीमती प्रशाली जाधव-दिघावकर, श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी श्री.अमित शेडगे, माणगाव तहसिलदार प्रियांका आयरे, तळा तहसिलदार ए.एम. कलशेट्टी तसेच माणगाव तालुक्यातील इतर अधिकारी वर्ग आणि द.म.तटकरे महाविद्यालयातील प्राध्यापक श्री.बबन शिनगारे व विद्यार्थी, नागरिक, पत्रकार हजर होते.

तसेच जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या आगमनाचे औचित्य साधून महाराजस्व

.../२

शॉप विकणे आहे
पनवेल महानगरपालिका हद्दीत ६१५ बिल्टअप एरिया असलेले शॉप विक्री करणे आहे.
-: संपर्क :-
9321592113
8104477440

# पोलादपूरकरांना विजपुरवठ्याअभावी गुरूवारी मनस्ताप ; स्विचींग स्टेशन बिनकामाचे आणि तालुका ५ तास अंधारात



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गेल्या अनेक वर्षांपासून पोलादपूर येथे महावितरणकडून विद्युतग्राहकांना सातत्याने उन्हाळ्याच्या झळा पोहोचविण्यासाठी अंधारात ठेऊन संतप्त करण्याचा प्रयत्न होत असून तुर्भे बुद्रुक येथील स्विचिंग स्टेशनचा उपयोग होत नाही कारण तीन फिडर असूनही एकाही फिडरवरून विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न महावितरणचे अभियंते करीत नसल्याचे दिसून आले आहे. लवकरच पोलादपूर तालुक्यातील ग्राहकांच्या मागण्यांसंदर्भात सहविचार बैठक आयोजित करण्याची मागणी विद्युत ग्राहक करणार आहेत.

पोलादपूर तालुक्यात शहरी व ग्रामीण भागात विद्युत पुरवठा करण्यासाठी महाड एमआयडीसी आणि महाड चांभारखिंड येथून दोन फिडर पुर्वीपासून कार्यरत आहेत.

यामध्ये सवाद, धारवली विभागाच्या एका फिडरची भर पडली असून या सर्व फिडरमुळे पोलादपूर तालुक्यात कोणत्याही भागात विद्युत पुरवठ्यातील अडचणी व गैरसोयी सोडविण्याच्या कामादरम्यान विद्युतपुरवठा पूर्णपणे खंडीत ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही. पोलादपूर तालुक्यातील लोहारे तुर्भे पुलाजवळील दिविल गावाच्या प्रारंभी असलेल्या तुर्भे बुद्रुक येथील २२ केव्ही स्विचिंग स्टेशनमुळे तीनही फिडरमार्फत आलेला विद्युतपुरवठा तालुक्यातील तीन विभागांना करण्याची सोय झाली. मात्र, तरीही या तीन फिडरवर कोठेही तांत्रिक दोष निघाल्यास पोलादपूर तालुक्याचा संपूर्ण विद्युत पुरवठा खंडीत ठेवण्यात येत असल्याचा अनुभव तालुक्यातील विद्युत ग्राहक घेत आहेत.

पोलादपूर शहरामध्ये अनेक अपार्टमेंटस बांधकाम सुरू झाल्यापासून विद्युत ग्राहकांची संख्या वाढली असून सर्वत्र विद्युत पुरवठ्यासाठी रोहित्रांची मागणी असूनही अनेक अपार्टमेंटसमध्ये तात्पुरती विद्युतजोडणी देऊन नंतर कायम करण्यात आल्याने ट्रान्सफॉर्मरची संख्या मर्यादितच राहिली आहे. पावसाळ्यापूर्वीच्या कामांसाठी उन्हाळ्याच्या झळा बसू लागल्यानंतरच महावितरणला मुहूर्त मिळत असल्याने दोनच वर्षांपूर्वी पोलादपूर येथील अभियंत्याच्या कारभाराविरोधात उपो–षणाचे हत्यार उपसण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात त्यावर काहीही निर्णय न झाल्याने महावितरणचे कोणी काही बिघडवू शकत नाही आणि जे चाललंय ते असेच चालू राहणार अशी उद्दामपणाची भूमिका गेली तीन वर्षे बदलीची प्रतिक्षा करणाऱ्या अभियंत्यांकडून घेतली जात असल्याने विद्युत ग्राहकांना विनाकारण अंधारात राहावे लागून उन्हाळ्याच्या झळाही सोसाव्या लागत आहेत.

पोलादपूर तालुक्यातील विद्युत ग्राहकांच्या समस्यांबाबत महावितरणच्या गोरेगाव विभागीय अभियंता पाचपोहे यांनी विशेष लक्ष देऊन सोडवणूक करण्याची मागणी पोलादपूर शहर आणि ग्रामीण भागातील ग्राहकांकडून होत आहे.

# जासई हायस्कूलमध्ये दहावीचा शुभचिंतन व सेवापूर्ती समारंभ संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील जुनियर कॉलेज जासई या विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन आणि या विद्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या सेवकांचा निरोप समारंभ संपन्न झाला.या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कामगार नेते भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना एसएससी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या तसेच या शाळेतून सेवानिवृत्त झालेल्या सेवकांना त्यांच्या पुढील सुखी व आनंदी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी या विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत या विद्यालयाची जी भौतिक व शैक्षणिक प्रगती केली आहे आणि त्यांच्या इतर सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीचा राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य आचार्य शिरोमणी पुरस्कार –२०२२ मुंबई येथे त्यांना प्राप्त झाल्या बद्दल त्यांचा सत्कार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुरेश पाटील व शाळेचे चेअरमन अरुण जगे यांच्या शुभ हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाची प्रस्तावना सौ. बाबर एस. एम. यांनी केली.तसेच या शाळेविषयी कृतज्ञतेची भावना विद्यार्थी प्रतिनिधी यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. त्याच बरोबर शिक्षक प्रतिनिधी म्हणून सौ म्हात्रे एम.डी.मॅडम यांनी विद्यार्थ्यांना व सेवानिवृत्त झालेल्या आपल्या सहकारी सेवकांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमा प्रसंगी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी भेट वस्तू दिली. तसेच सेवानिवृत्त सेवकांनी सुद्धा शाळेसाठी भेटवस्तू दिल्या यामध्ये सौ. घरत टी.टी.यांनी शाळेसाठी साऊंड सिस्टिम भेट म्हणून दिली.

तसेच सौ पाटील एस. एस. यांनी शाळेसाठी वातानुकूलित यंत्र (एसी) दिली तसेच कोकीळ एस.डी. यांनी वॉटर प्युरीफायर दिले तसेच सौ. बी. एल.पाटील मॅडम यांनी शाळेसाठी पंचवीस हजार रुपये देणगी दिली. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे उपप्राचार्य मोरे पी.पी.सर, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर व ग्रामस्थ विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रयत सेवक संघाच्या महाराष्ट्राचे संघटक नुरा शेख यांनी केले.

**पृष्ठ क्र.१ वरुन...**

## सर्वधर्म समभाव एकत्रित असल्याचे प्रतिक नवी मुंबईत दिसून आले : सुरेश मेंगडे

प्रत्येकांनी जागरुक राहून आपल्या परिसरात अनुचित प्रकार घडत असतील तर त्याची तात्काळ माहिती संबंधित पोलीस ठाण्याला देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे माता–भगिनी यांनी सुद्धा आपल्या कुटुंबासाठी केलेल्या कामाचे त्यांनी कौतुक केले. नवी मुंबई परिसर हा व्यसनमुक्ती करण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. लवकरच नवी मुंबई हा गुटखा व ड्रग्स मुक्त परिसर असेल असेही त्यांनी यावेळी सांगितले. सदर कार्यक्रमाचे नियोजन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि विजय कादबाने व त्यांच्या सहकाऱ्यांनी केल्याबद्दल विशेष कौतुक यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी केले.

## मच्छीमार संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा द्या

रायगड जिल्हयास १२.३० कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला. निसर्ग चक्रीवादळात बाधित झालेल्या मच्छिमारांसाठी शासनाने दिनांक २४ जून, २०२० अन्वये विशेष बाब म्हणून वाढीव अर्थसहाय्य मंजूर केले आहे. त्यानुसार रायगड व रत्नागिरी जिल्हयातील बाधीत मच्छिमारांना महसूल विभागाकडून रुपये १३६.७० लक्ष वाटप करण्यात आले आहे. त्यामध्ये रायगड जिल्हयासाठी ९३.१६ लक्ष रुपयांचा समावेश आहे. कोरोना महामारीच्या पार्श्वभुमीवर सन २०२०–२१ व सन २०२१–२२ मध्ये मासेमारीवर वा मासे विक्रीवर कोणाताही परिणाम होऊ नये यास्तव शेतमालाच्या अनुषंगाने योग्य ती सुट देण्यात आली होती. तसेच डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपुर्ती योजनेंतर्गत सन २०२१–२२ या वर्षाकरिता अर्थसंकल्पित निधी ६० कोटी रुपये वितरित करण्यात आला असून हिवाळी अधिवेशनामध्ये पुरक मागणीद्वारे मंजूर ५० कोटी रुपये निधी वितरित करण्याच्या अनुषंगाने विभागाकडून कार्यवाही सुरू आहे.

## कर्जत नगरपरिषदेमार्फत नागरिकांच्या मालमत्ता इमारतींचे सर्वेक्षण

पादचाऱ्यांना, वयोवृध्दांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना चालणे म्हणजे तारेवरची कसरत करण्यासारखे आहे. रस्त्यांवर मोकाटपणे उभ्या असलेल्या हातगाड्या, वाहने, नो पार्किंग बाबत योग्य ती उपाययोजना न करता नगरपरिषद केवळ आपली आर्थिक लाभासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसत आहे अशी पोस्ट माहिती अधिकार कार्यकर्ता प्रभाकर गंगावणे यांनी सोशल मीडिया टाकून प्रश्न उपस्थित केला आहे.

## निवृत्त शिक्षकांचे निवृत्ती वेतन रखडले

रजेवर जात असताना त्यांनी आपला कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवणे आवश्यक असताना असे का केले गेले नाही? याबाबत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांनी योग्य ती चौकशी करावी अशी मागणी निवृत्तीवेतनधारक शिक्षकांमधून केली जात आहे.

## गरुडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन अभ्यासिकेचे उद्घाटन

अभियान कातकरी उत्थान अंतर्गत जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत आदिवासी बांधवांना मोफत ७/१२ वाटप, घरठाण मंजूर प्रकरणी ७/१२ वाटप, वनहक्क मंजूर दावे ७/१२ वाटप, राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजना लाभ मंजूर धनादेश वाटप, जातीचे दाखले, शिधापत्रिका वाटप तसेच कृषी विभाग व पंचायत समिती माणगाव यांच्याकडील लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शनही केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माणगाव उपविभागीय अधिकारी प्रशाली जाधव–दिघावकर यांनी केले तर आभार प्रदर्शन माणगाव तहसिलदार प्रियांका आयरे यांनी केले. या कार्यक्रमास माणगाव तालुक्यातील विद्यार्थी, नागरिक तसेच आदीम कातकरी बांधव व भगिनींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

---

मे.सोनावणे सो

अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.३४२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०४/२०२२

१) तबस्सुम अब्दुल रझाक पटेल
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
२) मोहम्मद मोइन अब्दुल रझाक पटेल
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.रुम नं.५०१, प्लॉट नं.६, भानु बिल्डींग,
से.३०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती अर्जदार नं.२ यांचे वडील पै.अब्दुल रझाक राजा पटेल हे दि.२५/०९/२०२० रोजी कुवैत या परदेशात मयत झाले आहे. तसेच त्यांची आई पै.बीअम्मा राजा पटेल ह्या दि.११/०९/२००२ रोजी मौजे : मोर्बे, तालुका : माणगाव, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. पै.अब्दुल रझाक राजा पटेल यांचे सामाईक मालकीच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**

| अ.क्र. | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | भानु ज्योत, २०/३०, सदनिका क्र.५०१, पाचवा मजला, प्लॉट नं.६, सेक्टर ३०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड | ७०.६ चौ.मी. ६.४० चौ.मी. टेरेस |
| २ | मेट्रो पॉईंट, सदनिका क्र.२०२, दुसरा मजला, प्लॉट नं.४०, से.११, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | ३७२ चौ.फुट |
| ३ | मेट्रो अपार्टमेंट, सदनिका क्र.१०१, दुसरा मजला, प्लॉट नं.११०, से.१०, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | २३.३५ चौ.मी. |
| ४ | शॉप नं.०५, तळमजला, आशियाना, प्लॉट नं.११, से.३०, ओवे खारघर, ता.पनवेल, जि.रायगड | १५.०९० चौ.मी. |
| ५ | शॉप नं.०४, तळमजला, आशियाना, प्लॉट नं.१९, से.३०, ओवे खारघर, ता.पनवेल, जि.रायगड | १५.१३० चौ.मी. |

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.अब्दुल रझाक राजा पटेल यांचे वारसदार या नात्याने पै.अब्दुल रझाक राजा पटेल यांचे हिश्श्याचे इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील पै.अब्दुल रझाक राजा पटेल यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१०/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, उरण

दि.चौ.अर्ज क्र.२०२/२०२१
नि.नं.८/ड

१) श्री.भालचंद्र राघो पाटील
रा.पाणजे, ता.उरण, जि.रायगड–४००७०२
२) श्री.सुनील राघो पाटील
रा.उपाध्य वाडी, ई–७०७, कुंभारवाडा, उरण,
ता.उरण, जि.रायगड–४००७०२
३) श्री.हरेश्वर राघो पाटील
रा.पाणजे, ता.उरण, जि.रायगड–४००७०२
४) श्रीमती.पारुबाई शांताराम पाटील
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड–४००७०२
५) सौ.मंजुळा रामभाऊ पाटील
रा.उरण कोळीवाडा, उरण, ता.उरण, जि.रायगड–४००७०२
६) सौ.अनिता जोमा परदेशी
रा.२७०, भिंगारी, भारत गॅस जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
७) सौ.विठाबाई चंद्रकांत पाटील
रा.उरण कोळीवाडा, उरण, ता.उरण, जि.रायगड–४००७०२
८) सौ.कविता केसरीनाथ पाटील
रा.२०५, माझगांव, मुंबई, मुंबई–४०००१० — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.राघो उर्फ रघु हसुराम पाटील हे दि.२१/१२/१९८९ रोजी मौजे : पाणजे, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. कै.राघो उर्फ रघु हासुराम पाटील यांचे मालकीची व ताबे कब्जे वहिवाटीतील शेतजमीन मिळकत खालील वर्णन केलेल्याप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| फुंडे/२०७/५८१ | ३९ | ९ अ | ०–०६–० |
| | ४३ | १५ | ०–०७–९ |
| | ४८ | ९ | ०–०४–० |
| | ६३ | १ ब | ०–११–८ |
| | १२१ | ८ | ०–११–० |
| फुंडे/१५१ ब/४८४ | १०४ | ७ क | ०–०८–६ |
| | १२२ | २७ | ०–०३–० |
| | १६० | २ क | ०–०९–० |
| फुंडे/३१/५२+२०७/८३ | १२९ | ५ क | ०–०७–१ |
| | १३४ | १ ब | ०–०९–० |
| | २० | १ ब | ०–०४–० |
| | ८ | २+३ अ | ०–०५–६ |
| | १९ | १२ ब | ०–०२–० |
| फुंडे/७७/५०ब/२९२ | १९ | १२ क | ०–०२–० |
| फुंडे/१३४ | ८९ | १ इ | ०–१४–५ |
| | ७६ | १ ब | ०–०८–६ |
| डोंगरी/५ | २३ | २७ | ०–०६–० |

वरील मिळकतीच्या कै.राघो उर्फ रघु हसुराम पाटील यांच्या सहमालकी हक्काच्या असून त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार मिळण्यास पात्र आहेत. वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारसदाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी अथा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे.न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून, पुरावा घेवून मे.न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज २३/१२/२०२१ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

---

### जाहीर नोटीस

मे.ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथमवर्ग कर्जत यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.८३/२०२२
ने.ता.१८/०४/२०२२

श्री.हरेश्वर गोविंद कांबरी
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
रा.बार्डी, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

सरपंच / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपचांयत चिंचवली
मु.चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाले

अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे

अर्जदार यांनी कर्जत येथील ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब, प्रथमवर्ग यांचे कोर्टात चौ.अर्ज ८३/२०२२ हा अर्ज अर्जदार यांनी त्यांचे आजोबा कै.गणपत फुगाजी कांबरी यांचा मृत्यू दि.१८/०५/१९७२ रोजी मु.बार्डी, ता.कर्जत, जि.रायगड येथे झाला. अर्जदार यांच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चिंचवली येथे त्यांचे मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये केलेली नसल्याने अर्जदार यांनी त्यांच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद घेणेकामी मा.कोर्टाकडून आदेश मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जदार यांच्या आजोबांच्या मृत्यूची दि.१८/०५/१९७२ ही नाही व तसा मृत्यू नोंदणीचा आदेश देण्यात येवू नये, असे म्हणणे असेल त्यांनी उपनिर्दिष्ट प्रकरणी मा.कोर्टात दि.१८/०४/२०२२ अथवा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत हजर राहून आपल्या हरकती लेखी कळवाव्यात जर मुदतीत कोणाकडूनही हरकत उपस्थित झाली नाही तर मा.कोर्ट अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवून अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचे लाभात त्यांची उशिराने झालेली नोंद करण्याचा आदेश पारित करेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.०९/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

श्री.मुजावर साहेब

अर्जदारातर्फे वकील
धनश्री मा. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.३२८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) श्रीमती.वंदना शंकर पाटील
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.प्रणव शंकर पाटील
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.प्रचित शंकर पाटील
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
१ ते ३ सर्व रा.अे टाईप १०७, खोली नं.१, सेक्टर १३,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) प्रियांका शंकर पाटील उर्फ
सौ.प्रियांका अक्षय राणे
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बी ३, ठाणे एकता को.ऑप.हौ.सो.,
डी.आर.रोड, बाळ गणपती मंदिरा समोर,
चरई, ठाणे (प) ४००६०१ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी शंकर हरिभाऊ पाटील हे दि.२०/०१/२०२२ रोजी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत शंकर हरिभाऊ पाटील यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत आहे.

**–: परिशिष्ट ‘अ’ :–**

महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ‘नवी मुंबई’ प्रकल्पाकरिता संपादीत केली असून सदर मिळकतीचे संपादनासंबंधी पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ‍ॅवॉर्ड जाहीर करण्यात आले आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | १६० K | २६४ | १ | १–१४.७ |
| | | २६४ | २ | ०–१८.२ |
| | | २६६ | १ | ०–१८.० |

**–: परिशिष्ट ‘ब’ :–**

महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ‘नवी मुंबई’ प्रकल्पाकरिता संपादीत केली असून सदर मिळकतीचे संपादनासंबंधी पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ‍ॅवॉर्ड जाहीर करण्यात आले आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : पेणधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | २८६ B | ३४ | १ | ०–२६.८ |
| | | ६९ | १ | ०–१५.८ |
| २ | ११३/२ | २९ | ० | ०–०९.४ |
| | | ३० | ० | ०–१४.० |

**–: परिशिष्ट ‘क’ :–**

महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ‘नवी मुंबई’ प्रकल्पाकरिता संपादीत केली असून सदर मिळकतीचे संपादनासंबंधी पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ‍ॅवॉर्ड जाहीर करण्यात आले आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : पेणधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| निवाडा पेणधर/२००८ | ३६ | १० | ०–१४.०० |

**–: परिशिष्ट ‘ड’ :–**

महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ‘नवी मुंबई’ प्रकल्पाकरिता संपादीत केली असून सदर मिळकतीचे संपादनासंबंधी पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ‍ॅवॉर्ड जाहीर करण्यात आले आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | UC/ १०३ | २०३ | ४ | |
| २ | ८५/१०३ | २११ | ३ | |

**–: परिशिष्ट ‘इ’ :–**

**मौजे : पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सिडको लिमिटेड यांच्या हद्दीतील सेक्टर १३ मधील प्लॉट नं.४ वरील अे १०७ मधील सदनिका क्र.१, क्षेत्र १३.५०८.०० चौ.मी.ही सदनिका.**

सदर मिळकत अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी कै.शंकर हरिभाऊ पाटील यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता त्याने मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्याचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०९ माहे मार्च सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## जागतिक महिला दिना निमित्त हळदी कुंकू व आरोग्य विषयक योग्य मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राजमाता जिज़ाऊ फ़ाउंडेशन मार्फत पळसदरी हद्दीतील सर्व बचत गटाच्या महिलांसाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले.

पळसदरी श्री स्वामी समर्थ मठ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनाथाची माय सिंधुताई सपकाळ यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. राजमाता जिजाऊ फाऊंडेशन च्या अध्यक्षा पूजा सुर्वे यांनी उपस्थित महिलांचे स्वागत करून प्रास्ताविक केले, याप्रसंगी सुवर्णा सूर्वे, मनीषा पवार, वर्षा पवार,कांचन देशमुख,वैशाली मोरे, कु. प्रियंका पवार, मोनाली दरेकर,जुई दरेकर उपस्थित होत्या. वेलनेस सेंटरचे डॉ. मानिक कलासुरे यांनी महिलांना त्यांच्या आरोग्य विषयक योग्य ते मार्गदर्शन केले.या या हळदी कुंकू कार्यक्रम मध्ये महिलेचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा साठी पळसदरी, वर्णे, तिघर धनगरवाडी, नांगुर्ले अणि तळवली येथील ग्रामपंचायत हद्दीतील सर्व बचत गटाच्या महिला मोठ्या संखेने उपस्थिति होत्या. सूत्र संचालन संदीप बोराडे यांनी केले.

## जागतिक महिला दिन वावंजे येथे साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक महिला दिनानिमित्त हिंडाल्को इंडस्ट्रीज लि. तळोजा – सामाजिक सहभाग व ग्रामीण विकास अंतर्गत आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पनवेल २ यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च जागतिक महिला दिन वावंजे येथे साजरा करण्यात आला. यामध्ये महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन, महिला आरोग्य व स्वछता रोल प्ले, बेटी बचाव–बेटी पढाव कार्यक्रमांतर्गत पहिल्या मुलीच्या जन्माचे स्वागत भेट आणि सर्टिफिकेट वाटप, मुलीच्या पोषणावर आधारित रोल प्ले, अंगणवाडी सेविकांना पोषण अभियानात उत्कृष्ट काम केल्याबद्दल सर्टिफिकेट वाटप, महिलांची आरोग्य तपासणी शिबीर, मुलीवर आधारित गाणी इत्यादी कर्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कंपणीचे अधिकारी वर्ग सुधीर मिश्रा – एच आर हेड, अमृत अबुलकर, एच आर मॅनेजर, लहू रौंधळ – सी एस आर अधिकारी , मनोज चरहाटे, ग्रामपंचयत सरपंच डी बी म्हात्रे, उपसरपंच जिणेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य चांदना पाटील, कांचन पाटील ,कविता पाटील तसेच वक्ते म्हणून पोलीस इन्स्पेक्टर विमल बिडवे, ऍड संतोषी चव्हाण, डॉ प्रतिभा आथरे, डॉ सोनाली कलागुडे, डॉ दिव्या मिथेल, वंदना कुंभार, आशा तावडे, चंचल विजेवर अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीम सविता सांगळे ,श्रीम दीपा मटकर ,श्रीम जोती गांधी,श्रीम वनिता तांडेल, तसेच गावातील प्रतिष्ठित व्यक्ती सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि सर्व लाभार्थी पालक वर्ग उपस्थित होते.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## नेरळ येथील एलएइएस शाळेवर कारवाई करावी



**दै.रायगड नगरी । कर्जत**

विद्यार्थ्यानी फी न भरल्यामुळे एस.एस.सीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासुन वंचित ठेवणा–या नेरळ येथील एलएइएस शाळेवर कारवाई करावी अशी मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलनचे। राज्य उपाध्यक्ष अ‍ॅड.कैलास मोरे यांनी केली आहे.

सम्यक विद्यार्थी आंदोलनतर्फे गटविकास अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी यांना निवेदन दिले की, मार्च ०२० पासुन संपुर्ण भारतात कारोना संसर्गामुळे लॉकडाऊन सुरू झाला. यामुळे अनेकांचे काम धंदे, उदयोग, नोक–या गेल्या. यामुळे पालकांची आर्थिक परिस्थीती बिकट होऊन बसलेली आहे. अशा परिस्थीतीत शाळा सुद्धा सुरू नव्हत्या परंतु एक पर्यायी व्यवस्था म्हणुन ऑनलाईन एज्युकेशन सुरू झाले. परंतु अशा परिस्थीतीमध्ये सुद्धा अनेक शाळांनी नेहमीप्रमाणे फी वसुली सुरू केली व करीत आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना फि शिक्षणापासुन वंचित ठेवु नये असे वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. परंतु शासनाचे आदेश एलएईएस शाळेनी पाळलेले नाहीत. सदरची बाब विद्यार्थ्यांवर अन्यायकारक अशी आहे.

यासंदर्भात सम्यककडे अनेक पालकांनी तक्रारी केलेल्या होत्या की, दि.२ मार्च २०२२ रोजी शाळेने एसएसएसी परिक्षेच्या तोंडी परिक्षेला बसु दिले नाही. कारण विद्यार्थ्यांना फि भरली नाही म्हणुन त्यांना शिक्षणापासुन वंचित ठेवलेले आहे. यासंदर्भात पालकांनी शाळा व्यवस्थापण यांच्याकडे दाद मागितली परंतु अदयाप प्रशासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतली नाही. उलट शाळा व्यवस्थापकांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन धमकावले. तसेच पालकांची आयोग्य फी अकारणीबाबत तक्रारी आहेत त्याचा सुद्धा शाळा खुलासा करीत नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक खुप नुकसान झाले आहे.तसेच त्यामुळे विद्यार्थी व पालक प्रचंड ताणावात आहेत.

शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासकीय आदेशानुसार स्प्पष्ट केले आहे की, विद्यार्थ्याने शाळेची फी भरली नाही म्हणुन शाळा व्यवस्थापन अशा कोणत्याही विद्यार्थ्याला प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेण्यास किंवा परिक्षेस बसण्यास प्रतिबंध करू शकत नाही. तसेच अशा विद्यार्थ्यांचा निकाल सुद्धा रोखून ठेवु शकत नाही असा आदेश शासनाने दिलेला आहे. असा शासनाचा आदेश असताना सुद्धा नेरळ येथील एलएइएस शाळेने शेकाडो विद्यार्थ्यांना फि भरली नाही म्हणुन शिक्षणापासुन वंचित ठेवलेले आहे. एलएइएस शाळा जर शिक्षणासंदर्भातील प्रचलित कायदे तसेच शासन आदेशाला जुमानत नसेल तर त्यांची मान्यता रदद करा तसेच योग्य ती कडक कारवाई त्यांचेवर करावी अशी मागणी गटविकास अधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांना निवेदनामार्फत करण्यात आली. तसेच यावेळेस अधिका–यांना इशारा सुद्धा देण्यात आला की, आपल्याकडून आमच्या निवेदनाची कुठल्याही प्रकारे दखल न घेतल्यास आम्हाला आपल्याविरूद्ध विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी तिव्र स्वरूपाचे आंदोलन छेडावे लागेल. त्यामुळे निर्माण होणा–या कायदा सुव्यवस्था परिस्थीतीस आपण सर्वस्वी जबबदार रहाल याची स्पष्ट नोंद घ्यावी.कारण विद्यार्थ्यांना न्याय मिळवुन देणेची सर्वस्वी जबाबदारी हि शासनाची व प्रशासनाची आहे.

याप्रसंगी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे अँड कैलास मोरे, हरिश्चंद्र यादव, अनिल गवळे, धर्मेंद्र मोरे, सुनिल सोनावणे, संतोष जाधव, आशोक कदम, लोकेश यादव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या विधानाबाबत नाभिक तरूण संघ पोलादपूरतर्फे निषेधाचे निवेदन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



देशाचे केंद्रीय राज्यमंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष ना.रावसाहेब दानवे यांनी राजकीय भाषणे व प्रतिक्रिया देताना नाभिक समाजाचा अवमान करणारे विधान केल्याबद्दल देशाचे पंतप्रधान ना.नरेंद्रजी मोदी यांना नाभिक तरूण संघ पोलादपूरतर्फे पत्र देऊन निषेध केला. पोलादपूरचे नायब तहसिलदार समीर देसाई यांनी समाजाचे हे निवेदन स्विकारून पुढे पाठविण्याची ग्वाही दिली.

ना.रावसाहेब दानवे आणि यापूर्वीचे राज्याचे मुख्यमंत्री व विधानसभेतील विरोधीपक्षनेते आ.देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी तीन वर्षे आधी बहुजन समाजातील नाभिक समाजाचा अवमान करणारी विधाने केली होती. यापार्श्वभुमीवर रावसाहेब दानवे यांनी पुन्हा केलेल्या विधानामुळे समाजाच्या भावना तीव्र झाल्या. रायगड जिल्हाध्यक्ष सुदाम बाबू शिंदे, पोलादपूर तालुका अध्यक्ष विजय ग.पवार, आदेश बुरूणकर, विष्णू कदम, सुरेश पवार, पंढरीनाथ शिंदे, दिपक शिंदे, योगेश शिंदे, केशव शिंदे, विकास शिंदे, उमेश शिंदे आणि सचिन पवार आदींनी स्वाक्षरीसह हे निषेधाचे निवेदन पोलादपूर तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार समीर देसाई यांनी स्विकारले. यावेळी समाजबांधव तसेच पदाधिकाऱ्यांनी सदरचे निवेदन तहसिल कार्यालयामार्फत प्रधानमंत्री कार्यालयाला पाठविण्याचे आवाहन करण्यात आले.

## १३ मार्च रोजी मुरुडमध्ये भाजपा श्री - २०२२ शरीर सौष्ठव स्पर्धा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय जनता पार्टी मुरुड तालुका आयोजित भव्य शरीर सौष्ठव स्पर्धा भाजपा श्री २०२२ या स्पर्धेचे आयोजन मुरुडमध्ये रविवार दि.१३ मार्च २०२२ रोजी करण्यात आले असल्याची माहिती उपतालुका अध्यक्ष परेश किल्लेकर यांनी दिली आहे.

शहरातील बीच रोड विश्राम बागेसमोरील हिंदू बोर्डिंग (ओमकार विद्या मंदिर) येथे भा.ज.पा.चे महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री, कोकण संपर्क प्रमुख आम.रवींद्र चव्हाण, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद लाड विधानपरिषद आमदार निरंजन डावखरे, आमदार प्रशांत ठाकूर व भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ड.महेश मोहिते यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

याबाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले कि,भा.ज.पा.ने मला विश्वासाने तालुका उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून पक्षसंघटना वाढीसाठी आगामी काळात विविध उपक्रमांचे आयोजन करुन पक्षसंघटना बळकट करणे आवश्यक आहे.त्यासाठी तालुक्यातील युवा पिढी भा.ज.पा.कडे आकृष्ट करण्यासाठी मुरुड तालुका कार्यकारिणीच्यावतीने भव्य शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले आहे.

तालुक्यात यापूर्वी आशिष खोत, धीरज राणे यांच्या सारखे राष्ट्रीय पातळीवरचे खेळाडू निर्माण केले आहे. हे गतवैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी शहरामध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगीतले. तरी या शरीर सौष्ठव स्पर्धा सोहळ्याला सर्वांनी आवर्जून उपस्थित राहून स्पर्धकांना प्रोत्साहित करावे. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे उपतालुका अध्यक्ष परेश किल्लेकर यांनी केले आहे.

## श्री.विठ्ठल-रूक्मिणी मंदिर वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील श्री. क्षेत्र तळवली येथे शनिवार दि.१२ मार्च रोजी श्री. विठ्ठल–रूक्मिणी मंदिर वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली आहे.

स्वा.सु.अलिबागकर बाबा, धोंडूबाबा कोलटकर व गोपाळबाबा वाजे यांच्या क्रुपार्शिवादाने व ह.भ.प.गुरूवर्य दत्तूमहाराज महाराज कोलाटकर (मठाधिपती पंढरपूर) व ह.भ.प.मारुती महाराज कोलाटकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या कार्यक्रम प्रसंगी स.७ वा. देवतांचे अभिषेक व महापूजा, स.८ वा.कळश स्थापना व ध्वजारोहण,८:३० वा.महाआरती, दुपारी २ ते ३:३० श्री. सत्यनारायणाची महापूजा, ३ ते ५ ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे ९ व १२ व्या अध्यायाचे सामुदायिक पारायण, सायं.६ ते ७ हरिपाठ व तद्नंतर रात्रौ.९ वा.पर्यंत ह.भ.प.रायगड भूषण प्रसाद महाराज पानसरे ( भागलताचार्य) यांचे सुश्राव्य किर्तन व तद्नंतर महाप्रसाद व जागर भजन आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

या सर्व कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ, महिला मःडळ वजथ हनुमान क्रीडा मंडळाचे सदस्य मेहनत घेत आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा / वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या करारनामा/वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/ संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीनदाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड - द्रोणागिरी** | | | | |
| १ | ८५७ | बोकडविरा ५९/८५-८६<br>बोकडविरा ८४/८६ | ११/२<br>१८०/३<br>१८०/२ | ०-०५-०<br>०-०५-९<br>०-०४-८ | **१५० चौ.मी.** | **द्रोणागिरी भूखंड क्र. २४ बी, सेक्टर-४७, क्षेत्र १४९.८७ चौ.मी.** | **भूधारक- कै. काशिबाई हरिभाऊ घरत (मयत), यांचे वारस -**<br>१) श्री. धर्मेंद्र हरिभाऊ घरत<br>२) श्रीमती संजिवनी बाळकृष्ण म्हात्रे<br>३) कै. हेमलता मंगल पाटील<br>३.१) श्री. गणेश मंगल पाटील<br>४) कै. रजनी वसंत म्हात्रे<br>४.१) रोकेश वसंत म्हात्रे<br>४.२) श्रीमती हर्षला घरत<br>४.३) सौ.प्रमोदीनी प्रशांत घरत<br>**हक्कसोड पत्राव्दारे हक्क प्रदान -** श्री. धर्मेंद्र हरिभाऊ घरत | निरंक |
| | | | | **नोड - करंजाडे** | | | | |
| २ | ३८७ | करंजाडे १६८ ब | ४२/५<br>४२/४ | ०-११-६<br>०-११-६ | **२०० चौ.मी.** | **मौजे-करंजाडे, भूखंड क्र. १०८, सेक्टर-५, क्षेत्र-१९६.०३ चौ.मी.** | **मा. न्यायालयीन वारसदाखल्यानूसार व तसेच हक्कसोडनूसार पात्र भूधारक-**<br>**१) श्री. कृष्णा पदु भगत**<br>**२) श्री. शरद रामदास भगत** | निरंक |
| | | | **एकूण संपादित क्षेत्र** | **०-२३-२** | | | | |
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| ३ | उलवे ३२२ | खारकोपर ५२ ब<br>वहाळ ४३९<br>गव्हाण ४९४ | ४/१४<br>२१७/२<br>१९३/४<br>१९६/१ | ०-१३-९<br>०-३१-०<br>०-३३-५ | **एकूण मंजूर पात्रता ७०० चौ.मी. पैकी ४०० चौ.मी. प्रस्तावित** | **भूखंड क्र. २९६, सेक्टर-१९, क्षेत्र ४०० चौ.मी.** | **कै. तुळसाबाई बाळाराम म्हात्रे कै. महादेव बाळाराम म्हात्रे व कै. मुक्ताबाई सुंदर पाटील (मयत) यांचे वारस**<br>१. श्रीमती जनाबाई महादेव म्हात्रे<br>२. श्री. निवृत्ती महादेव म्हात्रे ऊर्फ निवृत्ती श्रीकांत म्हात्रे<br>३. श्री. विजय महादेव म्हात्रे<br>४. श्री. अजय महादेव म्हात्रे<br>५. श्री. उमेश महादेव म्हात्रे<br>६. श्री. मयुर महादेव म्हात्रे<br>७. श्रीमती मंदा ऊर्फ मंदाबाई जनार्दन म्हात्रे<br>८. श्रीमती वंदना ज्ञानेश्वर घरत<br>९. श्रीमती अनुसया रमेश म्हात्रे<br>१०.श्री. नितीन रमेश म्हात्रे<br>११.श्रीमती शैला महादेव पाटील<br>१२.श्रीमती वैशाली रमेश म्हात्रे ऊर्फ वैशाली परशुराम खोत<br>१३.कै. चंद्रकांत ऊर्फ श्रीकांत बाळाराम म्हात्रे (मयत) यांचे वारस<br>१४.श्रीमती चंद्राबाई श्रीकांत ऊर्फ चंद्रकांत म्हात्रे<br>१५.श्रीमती कुसुम गजानन गोंधळी<br>१६.श्रीमती सुचिता सुर्यकांत पाटील<br>१७.श्रीमती वृंदा राजेश मते<br>१८.श्रीमती सुगंधा देवनाथ पाटील<br>१९. श्री. मनोज सुंदर पाटील | |
| | | | **एकूण** | **०-७८-४** | | | | |
| ४ | उलवे ८२४ | वहाळ ६१४<br>वहाळ ४६८ | २२९/३<br>२८८/१ | ०-०२-०<br>०-०३-० | **४० चौ.मी. प्रस्तावित** | **भूखंड क्र. १४५, सेक्टर-१९, क्षेत्र ४० चौ.मी.** | **१) श्री. राजेश लक्ष्मण कांबळे** | |
| | | | **एकूण** | **०-०५-०** | | | | |
| ५ | तळोजा ३९० | पेंधर २४३ | ४७/३ | ०-१३-४ | **१०० चौ.मी.** | **भूखंड क्र. २५B, सेक्टर-१६, क्षेत्र १०० चौ.मी.** | **कै. राघो आंबो भोईर (मयत) यांचे वारस कै. शालिक उर्फ टिंबा गोसावी भोपी (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती कानुबाई शालिक उर्फ टिंबा भोपी<br>२) श्री. जयंत शालिक उर्फ टिंबा भोपी<br>३) श्री. मच्छिंद्र शालिक उर्फ टिंबा भोपी<br>४) श्रीमती प्रतिभा शालिक उर्फ टिंबा भोपी<br>५) श्री. अशोक शालिक उर्फ टिंबा भोपी<br>६) सौ. चंद्रभागा राजू थॉमस | निरंक |
| ६ | तळोजा ७८८ | तळोजा २३३/३९४ | ८७/३<br>८९/३ | ०-०७-४<br>०-११-१ | **१५० चौ.मी.** | **भूखंड क्र. १५४, सेक्टर-२, क्षेत्र १५० चौ.मी.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-३, दस्त क्र. १८५२८/२०२१ हक्कसोडपत्रानुसार **मो. इब्राहिम मो. इस्माईल पटेल** | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको/जनसंपर्क/४५४/२०२१-२२

# अधिसंख्य कर्मचाऱ्यांच्या मागणीसाठी आझाद मैदानावर धडक मोर्चा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी आझाद मैदानात मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली इथेच अधिसंख्य पदाची अर्धी लढाई आपण जिंकलो असा विश्वास व्यक्त करत अधिसंख्य पदाबाबत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेंशन लागू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी यामुळे सरकारवर दबाव निर्माण होईल असे प्रतिपादन ऑर्गानायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन महाराष्ट्र या संघटनेचे राज्याध्यक्ष शिवानंद सहारकर यांनी केले . ते आझाद मैदानावरील 'ऑफ्रोह'च्या धडक मोर्च्याला संबोधीत करत होते.



यावेळी व्यासपीठावर राज्य कार्याध्यक्ष राजेश सोनपरोते, राज्य उपाध्यक्ष देवराम नंदनवार, सहसचिव डॉ. अनंत पाटील, मार्गदर्शक डॉ.दिपक केदारे, राज्य सदस्य चंद्रभान सोनुने,नरेश खापरे,दत्तात्रय अन्नमवाड, ओमप्रकाश कोटरवार, मनीष पंचगाम, लिलाधर ठाकूर, महिला आघाडीच्या राजाध्यक्षा अनघा वैद्य, कार्याध्यक्ष रूक्मिणी धनी,उपाध्यक्ष प्रिया रामटेककर, माधुरी मेनकार, सचिव नीता सोमवंशी, सहसचिव वंदना नंदनवार, पुष्पा किटाळीकर, स्मिता भोईर, कलावती डोमकुंडवार, अमरावती विभाग प्रमुख प्रा. सुरेश पाटकर, पुणे विभाग प्रमुख भारती धुमाळ, ठाणे ऑफ्रोहचे जिल्हाध्यक्ष दयानंद कोळी, रत्नागिरी महिला आघाडी जिल्हाध्यक्ष उषा पारशे

यांच्यासह 'ऑफ्रोह'चे पदाधिकारी उपस्थित होते. जयेश अनंत तरे, गीतांजली कोळी, सिद्धेश्वर कोळी हेमंत सूर्यवंशी इ. सामाजिक कार्यकर्त्यांनी मोर्च्यास मार्गदर्शन केले. राज्याध्यक्ष सहारकर यांनी मोर्च्याला उपस्थित कर्मचा-यांना सांगितले की, ऑफ्रोह संघटनेचा उद्देश फक्त अधिसंख्य कर्मचाऱ्यांची नोकरी वाचवण्या इतका मर्यादित नाही तर संविधानाने आपल्या जमातीला दिलेले अधिकार प्राप्त करणे हा आहे.

२३/२०००चा असंविधानिक जात- प्रमाणपत्र पडताळणी कायदा रद्द करणे, जातीचे दाखले सुलभ मिळविणे, आदिवासी विकास विभागातील ६००० कोटींचा भ्रष्टाचार उघडकीस आणणे , १८ लाख बोगस विद्यार्थी आश्रमशाळेत दाखवून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार उघड करण्यासाठी लढा देणार असल्याचेही त्यांनी यावेळी राज्याध्यक्ष सहारकर यांनी शेवटी स्पष्ट केले. 'ऑफ्रोह'चे कार्याध्यक्ष राजेश सोनपरोते यांचे घणघणीत भाषण झालं..त्यांनी थेट शासनाला आव्ह-ानच दिले-...तुम्ही आमच्या १ कोटी अन्यायग्रस्तांना 'बोगस' म्हणता..तर आम्हाला वगळा.आमची १ कोटी संख्या वगळा आणि विधानसभा असू दे... लोकसभा असू दे.. किंवा स्थानिक स्वराज्य संस्था असू दे.. आम्हाला वगळून तुमचे अनुसूचीत जमातीचे मतदार संघ घोषीत करा..,असे खुले आव्हानही त्यांनी शासनाला केले. या मोर्च्यांला महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातील ऑफ्रोहच्या कर्मचा-यांनी हजेरी लावली होती. ऑफ्रोह महिला आघाडीच्या वतीने आवाहन केल्याप्रमाणे महिला कर्मचा-यांची संख्याही उल्लेखनीय अशीच होती.मोर्च्याच्या निमिताने उभारलेले व्यासपीठ व मंडपाबाहेरही मोर्चेकरी उपस्थित होते. यावेळी मोर्च्याच्या आयोजनाची जबाबदारी ठाणे ऑफ्रोहच्या सर्वच पदाधिक-यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली. या मोर्च्याला जवळपास अन्यायग्रस्तांच्या विविध ४० संघटनांनी पाठिंबा जाहिर केल्याने ऑफ्रोहच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.सुत्र संचालन नागपूर जिल्हा उपाध्यक्ष मधु पराड व ठाणे आफ्रोहचे उपाध्यक्ष जूंन मेस्त्री यांनी केले. आभार प्रदर्शन अनघा वैद्य यांनी केले.

## संक्षिप्त...

### संतोष आखाडे यांचा राजीनामा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील एक सेवाभावी संस्था म्हणून कार्यरत असणाऱ्या आणि मागील दहा वर्षांपासून अत्यंत तळमळीने काम करणाऱ्या मूळवासीय संघटनेचे होतकरू अन धडाडीने कामात स्वतःला झोकून देणारे मूळ वासीय संघटनेचे उपाध्यक्ष संतोष आखाडे यांना आपल्या महत्वाच्या कामातून सध्यातरी संघटनेला वेळ द्यायला मिळत नसल्यामुळे त्यांनी स्वेच्छेने आपल्या उपाध्यक्ष पदाचा राजीनामा मूळवासीय संघटनेचे अध्यक्ष संतोष शिंगाडे यांच्याकडे दि.७ रोजी सुपूर्द केला आहे.



आजवर संतोष आखाडे यांनी आपल्या संघटने साठी मोलाचे योगदान दिले असून त्यांच्या राजीनाम्यामुळे या पदाची जबाबदारी तितक्याच ताकदीने आणि संघटनेसाठी जोमाने करणाऱ्या नवोदित उपाध्यक्ष यांना आपले नेहमीच सहकार्य राहणार असून जेव्हा जेव्हा काही अडचणी निर्माण होतील त्यावेळेस नक्कीच आपण सहकार्याची भूमिका घेऊ असेही संतोष आखाडे यांनी स्पष्ट केले आहे.

### कडापे येथील लिम डोंगर परिसरातील वणवा विझविण्यात यश

**दै.रायगड नगरी । उरण**

सारडे गावाच्या दक्षिणेकडे कडापे गावालगत असलेल्या लिम डोंगर येथे मोठया प्रमाणात वणवा लागला होता. अशी माहिती कडापे येथील फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन)सर्पमित्र, निसर्ग संवर्धन संस्था चिरनेर-उरण चे सदस्य ऋषीकेश म्हात्रे यांना मिळाली त्यांनी त्वरित संस्थेचे सारडे येथील सदस्य राकेश शिंदे यांना संपर्क करून या घटनेची माहिती दिली. दोघेही वणवा लागलेल्या ठिकाणावर पोहोचल्यावर तेथे मोठया प्रमाणात वणवा पेटला होता. यामध्ये सुका पालापाचोळा आणि काही छोटी झाडे पूर्णतः जळून गेली होती. वनखात्याची मदत येईल ना येईल त्याची वाट न पाहता ऋषिकेश म्हात्रे व राकेश शिंदे यांनी आग विझविण्याचे प्रयत्न चालू ठेवले. ऋषीकेश म्हात्रे आणि राकेश शिंदे यांनी अथक प्रयत्न करून एक तासात पूर्ण वणवा आटोक्यात आणला. त्यामुळे आग अजून पसरण्याचा धोका टळला. उरण तालुक्यात डोंगरावर, माळरानावर वणवा लागण्याच्या तसेच आगी लावण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आग लावणाऱ्या व सजीव सृष्टीचा नाश करणाऱ्या, पर्यावरणाचे नाश करणाऱ्या समाज कंटकावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी फ्रेंड्स ऑफ नेचर या संस्थेने तसेच सर्व निसर्गप्रेमी, प्राणी मित्रांनी केली आहे.

## विवाहित महिलेची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन हरिहरेश्वर रोडवर असलेल्या गालसुरे या गावामध्ये एका २८ वर्षीय विवाहित महिलेने गावाच्या बाजूला असलेल्या विहिरीजवळ कोरड्या असलेल्या ओढ्यामध्ये अंगावर रॉकेल ओतून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रकार घडला आहे.

याबाबत श्रीवर्धन पोलिसांनी अकस्मात मृत्यू गुन्हा रजिस्टर क्रमांक २/२०२२ गुन्हा दाखल केला आहे. सदर मृत महिलेचे नाव सुहेली सुहास रहाटवळ, वय २८ असे असून तिने सदर कृत्य करण्याअगोदर कोणत्याही प्रकारची चिठ्ठी लिहिलेली नसून तिच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सदर महिलेला औषधोपचारासाठी श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले आहे. याबाबत श्रीवर्धन पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याची गरज : प्रशांत देशमुख

**दै.रायगड नगरी । चौक**

छत्रपती शिवाजी महाराज घडवण्यासाठी जिजाऊ असणे आवश्यक आहे. यासाठी जिजाऊच्या लेकीना वाचवणे गरजेचे आहे. आधुनिक जगात स्त्री व पुरुष समान असून स्त्रिया विविध क्षेत्रात कामगिरी बजावत आहेत. त्यामुळे स्त्रीभ्रूण हत्या रोखा असे आवाहन शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी केले.

तुळजाभवानी उत्सवा निमित्त न्हावे (तालुका मुरबाड) येथे आयोजित 'छत्रपती शिव-ाजी महाराज व तुळजाभवानी' या विषयावरील व्याख्यानात देशमुख बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव यांच्यासह गावातील विविध पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. यात महिलांची संख्या लक्षणीय होती. जिजाऊंनीच छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापना करण्याची प्रेरणा दिली. विविध कठीण प्रसंगात त्या कणखरपणे उभ्या राहिल्या. तुळजाभवानी वरील श्रद्धेतूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखान स्वराज्यावर चालून आला तेव्हा मावळ्यांना लढण्यासाठी प्रेरित केले. त्यातूनच एक इतिहास घडला. त्या पराक्रमाचे गोडवे आपण आजही गात आहोत.

तुळजाभवानी हे भक्तीप्रमाणेच शक्तीचे हे प्रतिक आहेत. राजमाता जिजाऊ यांच्या प्रमाणेच महाराजांनी येसूबाई, ताराराणी या छत्रपतींच्या घरण्यातील स्त्रियांनाही मोठा पराक्रम केला. राजकीय कौशल्य दाखवत स्वराज्य अबाधित राखले. या स्त्रियांनी जो पराक्रम दाखवला त्याला तोड नाही. आज तर आधुनिक काळात स्त्रियांना प्रगतीचे अनेक क्षेत्रे खुली झाली आहेत. त्या क्षेत्रात महिला आपले कर्तृत्व गाजवत आहेत. राजकारण, क्रीडा, प्रशिक्षण, लष्कर आदी सर्वच क्षेत्रात महिला पुढे आहेत हे सांगताना यांनी इंदिरा गांधी, कल्पना चावला यांचे उदाहरणे दिली. तरी देखील वंशाचा दिवा या नावाखाली स्त्रीभ्रूण हत्या केली जाते. जिजाऊ जन्माला येण्याआधीच तिला गर्भातच मारून टाकले जाते. तेव्हा पुन्हा घडायचा असेल, तर जिजाऊ असणे आवश्यक असल्याने स्त्रीभ्रूण हत्या टाळा असे आवाहन त्यांनी केले.

# मच्छिमारांच्या हितासाठी आ.प्रशांत ठाकूर यांचा विधिमंडळात आवाज

**दै.रायगड नगरी । पनवेल**





पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करण्यासाठी शासनाने बंदी घातल्यामुळे मच्छीमारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून मच्छिमारांच्या हितासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधत आवाज उठविला आहे.

राज्यात जवळपास ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला कोळी समाज आपल्या उपजिविकेसाठी पारंपारिक मत्स्य व्यवसायावर अवलंबून आहे. पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करण्यासाठी शासनाने बंदी घातल्यामुळे कोळी समाजाला आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागल्याचे निदर्शनास आले असून शासनाच्या बंदीमुळे पर्ससीन जाळयाद्वारे मच्छीमारी करणाऱ्या कोळी बांधवांच्या पारंपारिक मत्स्य व्यवसायात अडचणी आल्यामुळे कोळी बांधवांमध्ये असंतोष पसरला आहे. या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोळी बांधवांना आपला पारंपारिक मच्छीमारी व्यवसाय धोक्यात येवू नये म्हणून पर्ससीन जाळयादवारे मच्छीमारी करण्यासाठी घातलेली बंदी उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे मत्स्यविकास मंत्री अस्लम शेख यांनी लेखी स्वरूपात दिलेल्या उत्तरात म्हंटले कि, पारंपारिक मच्छिमारांचे हित जतन करण्यासाठी राज्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन जाळयाव्दारे करण्यात येणाऱ्या मासेमारीचा अभ्यास करण्यासाठी दिनांक ०९/०९/२०११ नुसार डॉ.व्ही. एस. सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

सदर समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात दिनांक ०५/०२/२०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन केले आहे. या शासन आदेशा मधील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन सप्टेंबर ते डिसेंबर या ४ महिन्याच्या कालावधीतच राज्याच्या जलधी क्षेत्रात मासेमारीस परवानगी दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ९३२७/२०१६ च्या अनुषंगाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन आदेश दिनांक ०७/१२/२०२० नुसार समिती गठीत केली आहे. सदर समितीचा अहवाला सादर केल्यानंतर मा.मंत्री मंडळाच्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.


## श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन

**रविंद्र नारायण राऊत प्रशासकीय भवन**
**ता.श्रीवर्धन, जिल्हा : रायगड**
(I.S.O. 9001 : 2015 प्रमाणित)

दूरध्वनी क्रमांक : ०२१४७-२२२३७८ ई-मेल : Shriwardhan.nagarparishad@gmail.com

क्र.श्रीनप/विद्युत/जाहिर दरपत्रक नोटीस/१५६०/२१-२२ दिनांक : १०/०३/२०२२

### जाहिर दरपत्रक नोटीस/२०२१-२२

श्रीवर्धन शहरामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व इतर आवश्यक साहित्याचा पुरवठा करणे, बसविणे व कार्यान्वित करणेचे काम नगरपरिषदेमार्फत करणेत येणार आहे. त्याची अंदाजपत्रके तयार करणेसाठी व तांत्रिक मान्यतेसाठी या कामाकरिता लागणारे साहित्य व दरसुचीमध्ये नमूद नसलेल्या इतर काही बाबींचे दरासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे. नामवंत व नोंदणीकृत पुरवठाधारक तसेच अनुभवी ठेकेदार यांनी आपलेकडील मेक नुसार स्पेसिफिकेशनसह दरपत्रक आपले लेटरहेडवर नगरपरिषदेस दिनांक ११/०३/२०२२ ते २१/०३/२०२२ या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून खालील बाबींचे दरपत्रके आवक-जावक विभागात सादर करावीत)

दरपत्रकासोबत पुरवठा धारकाचे नोंदणीकृत व्यवसायाचे कागदपत्रे जोडणे आवश्यक असेल, कोणतीही दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

Name of Work : Establishing CCTV System on the Shrivardhan Municipal Council Various Area in Shrivardhan

ESTIMATE AS PER MARKET RATE

| Sr. No. | Item Description | Unit | Qty | Rate | Total |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 5 MP, 1/2.7" CMOS image sensor, low illuminace high image defination output max.5 MP (2592X1944) @ support 2688X1520 @ 25/30 fps. H.265 codec, high compression rate, ultra-low bit rate Built in IR LED max IR distance. 60m. ROI, SMART H.264+/H.265+, flexible coding applicable to various band width and storage environment Rotation Mode, WDR, 3DNR, HLC, BLC digital watermarking applicable to various monitoring sences. Intelligent detection:intrusion, tripwire, Abnormality detection Motion detection video tempering no.SD card. SD card full, SD card error, network disconnected, IP conflict, illegal access, local alaram, voltage detection, audio abnormal. Alarm 1 in, 1 out:audio:1 in, 1 out support max. 256 GB Micro SD card. 12V DC/PoE Power supply, IP 67 Protection. | Per Nos | 01 | | |
| 02 | The Long Range access ANPR camera is designed with high-performance CMOS image sensor and independently developed processor capable of reading and extracting detailed vechicle information day and night inrelligent deep learning algorthm allows recognition of cechicle licence plate and vechicle capture and recognition of community road parking lot and other entrance and exit sureillance scenarios. GSCMOS image sensor, Video Compression standards: H.265/H.264M/H.264/H.264GB/MJPEG, Integrated design, IP67 | Per Nos | 01 | | |
| 03 | SITC of Next Generation General Surveilance Management Centre : Embedded device, 30x24 stable operation high performance sream media transfer and storage cpacity, support tied and cascade deployment support local storage and IP-SAN storage, Support GIS map (Google Raster Map) ONVIF complince GB/T 28 181 Standard protocol gateway connection, support intelligent device connection such as IVS Box, Support Platform SDK, Frount panel can displays system service status support 2000 channel support 10000 Mbps accounts management and 1000 online users support 700 Mbps local storage capability support 20 distributes seryer and 5 level cascade, support 84 cameras @ 2MP 25 FPS 15 Days with RAID 5. E-map max display 200 ch on one screen process 1000 channel alaram per second | Per Nos | 01 | | |
| 04 | STC of Next Generation Intelligent Video Server : Support min.12 ch digital video input Min 12 ch intelligent video analysis max 12 rules for each chaneel supported inteligent function includes tripwire intrude warning xone perimeter, Loitering, abandoned, object missing boject protection, illegal parking, vechicle, H264 standard compression high comp.ratio, dual nw ports, support 2.5" HDD for record & snapshot Restore default configraution with one click support alaram in/out RS485 | Per Nos | 01 | | |
| 05 | Camera Housing : Vendal proof camera housing with stand for bullet Camera (SS | Per Nos | 01 | | |
| 06 | Media Converter and Cable Connector Junction Box | Per Nos | 01 | | |
| 07 | 12 V DC 5MP SMPS Power Adaopter | Per Nos | 01 | | |
| 08 | 100/1000 single mode media converter duplex. | Per Nos | 01 | | |
| 09 | Branded 4 Port all Gigabyte with Fiber optic port | Per Nos | 01 | | |
| 10 | 16 CH NVR with 2HDDP support )H.264 S | Per Nos | 01 | | |
| 11 | 24 port all gigabite | Per Nos | 01 | | |
| 12 | Supplying and Laying OFC Media Converter, Enclouser, OFCpatch Cord & Spllcing | Per Nos | 01 | | |
| 13 | Electric Point : Electric Point for Power Supply | Per Nos | 01 | | |
| 14 | Coper Armared Cable 3 core 2.5 sq.mm | Per Nos | 01 | | |
| 15 | Pole Mount Steel TY (SS) | Per Nos | 01 | | |
| 16 | GI Wire | Per Nos | 01 | | |
| 17 | Installation Charges : Camera and NVR Installation and Setup Charges | Per Nos | 01 | | |

अटी व शर्ती

१) मोहोरबंद दरपत्रके दिनांक २१/०३/२०२२ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात स्वीकारल्या जातील.

२) पुरवठादार यांनी त्यांचे लेटरहेडवर वरील साहित्य पुरवठा करणेचा दर वाहतुकीसहीत अंकी व अक्षरी नमूद करणेचा आहे.

३) कोणतेही दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(विराज आत्माराम लबडे)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**श्रीवर्धन नगरपरिषद**